**कार्यालय जिल्हा जलसंधारण अधिकारी,जिल्हा परिषद (ल.पा.)विभाग,छत्रपती संभाजीनगर**

email-adceo@zpaurangabad.com/irrigationzpabd@gmail.com *ई*निविदानोटीसक्रमांकजिपऔ/सिंचन/ई-निविदा//2025-26

**जिल्हा परिषद उपकर 4702 लहान पाटबंधारे (101-53)(0 ते 100हे.)** जिल्हा जलसंधारण अधिकारी,जिल्हा परिषद (ल.पा.)विभाग,छत्रपती संभाजीनगर अंतर्गत खालील नमुद केलेल्या कामाच्या निविदा ग्रामविकास विभाग/ जिल्हा परिषदेकडे नोंदणी झालेल्या योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे ब-1 निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचेनाव | GST,Royalty, Insurونce सह निविदा रक्कम | निव्वळ कामाची निविदा रक्कम | इसारा रक्कम/ बयाना रक्कम | प्रशासकिय मान्यता क्रमांक व दिनांक | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | TenderFee Rs.+वस्तू व सेवाकर | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सि.ना.बां. परसोडा ता. वैजापुर | 1465643 | 1157998 | 11580 | जा.क्र.931 दि. 29/09/2025 | ता.मा.क्र.86 दि.26/09/2025 | 1160 | सुबेअ |
| | TOTAL | 1465643 | 1157998 | 11579.98 | 0 | 0 | 1160 | |

**अ)(Cover - I ) कंत्राटदारांसाठी आवश्यक कागदपत्रे.**

1) जिल्हा परिषदे कडील वैध नोंदणी प्रमाणपत्राची प्रत अपलोड/सादर करावी
2) निविदाधारकाचे पॅन कार्डची प्रत अपलोड/सादर करावी
3) निविदाधारकाचे GST नोंदणी प्रमाणपत्र व GST कर परतावा सन 2024-25 पर्यंत भरणा केलेले अपलोड/सादर करावे.
4) निविदाधारकाने व्यवसाय कर (P.T.R) प्रमाणपत्र व व्यवसाय कर (P.T.R) चलन सन 2024-25 पर्यंत भरणा केलेले अपलोड/सादर करावे.
5) निविदाधारकाने आयकर प्रमाणपत्र (Income Tax) माघील तीन वर्ष सन 2022-23, 2023-24 व 2024-25 (दिनांक 31.03.2025) अपलोड/सादर करावे.
6) निविदाधारकाने स्वत:च्या लेटर पॅडवर विहित नमुन्यातील घोषणापत्र ( कामनिहाय स्वतंत्र) Declaration of the Contractor,
7) निविदा फिस व बयाणा/इसारा(EMD) रक्कम ऑनलाईन रोख स्वरुपात भरणा करावा. तसेच RTGS/NEFT किंवा कॅश मध्ये भरणा करु नये. संबंधित निविदाधारक यांच्या बँक खात्यातुन निविदा फिस व बयाणा/इसारा(EMD) रक्कम भरणे बंधनकारक राहिल. (निविदाधारक यांनी बँक पास बुकची छांयाकित प्रत सादर करावी).
8) समकक्ष स्वरुपाच्या तुल्यबळ किंमतीच्या पुर्ण केलेल्या कामाची किंमत मागील 5 वर्षात निविदा कामांच्या किंमतीनुसार खालीलप्रमाणे असणे बंधनकारक आहे.
   अ. तीन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत,बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या 40% पेक्षा कमी नसावी.
   ब. दोन सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत,बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या 50% पेक्षा कमी नसावी.
   क. एक सारख्या पध्दतीची कामे ज्यांची काम निहाय किंमत,बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रक्कमेच्या 80% पेक्षा कमी नसावी.
9) सर्वच निविदांमध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट असून पुर्ण केलेली कामे व हातातील कामे यांचे सविस्तर विवरण व त्यासंलग्न कागदपत्रे अपलोड करावीत. बिड कॅपॅसीटीत अपात्र ठरल्यास व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही. The tender will be qualified only if their available bid capacity is more than total estimated value of the works for which he has offered his bid. The available bid capacity will be

calculated as under. Available bid capacity=(A x N x 1.5) −B Where,

A = Maximum Turnover of civil Engineering works in any one year during the last 5 years certified by Charted Accountant

N = Number of year prescribed for the completion of the work for which bids are invited

B = Value of existing commitments and on going works to be completed during the next 24 monts

10) महाराष्ट्र शासन मृद व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.3 निविदा 0417/प्रकरण क्र.247 / एम पी.1 दि.08/04/2021.), कंत्राटदाराने संस्थेचे नावं कुठेही काळ्या यादीत टाकले नसल्या बाबतचे रू.100/- च्या बाँड पेपरवर घोषनापत्र करून सोबत जोडावे, सोबत जोडलेले सर्व कागदपत्रे बरोबर असल्याचे प्रतिज्ञापत्र रू.500/- च्या बाँड पेपरवर लिफाफा क्र.01 मध्ये जोडणे मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.निविदेतील लिफाफा क्र.01 मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करतांना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास होणाऱ्या परिणामास कंत्राटदार जबाबदार राहील याची नोंद कंत्राटदारांनी घ्यावी.तसेच प्रस्तावित कामांचे दोन्ही थडीवरील शेतक-यांचे काम सुरू करण्यापुर्वी संमती पत्र घेणे बंधनकारक राहील, मात्र त्या संदर्भात जि.प.कडून कोणताही मोबदला रक्कम देय राहणार नाही.

**ब) (Cover - II )**

1) निविदाधारकाने कार्यालयाने दिलेल्या BOQ File मध्ये दर नमुद करून अपलोड करावे.
2) प्राईज व्हेरीएशन क्लॉज लागु राहणार नाही,
3) कामाकरिता दोष निवारण कालावधी 1 वर्षाचा राहिल,
4) एखादे कागदपत्र अपूर्ण राहिल्यास निविदेबाबत हक्क सांगता येणार नाही तो सर्व अधिकार जि.प. औरंगाबाद यांच्याकडे राखीव राहील, अपलोड केलेली कागदपत्रे कोणत्याही टप्प्यावर खोटी आढळल्यास संबंधित निविदाधारक / कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात येईल, निविदा स्वीकारण्याचा अथवा फेटाळण्याचा **पूर्ण अधिकार निविदा समिती जि.प. छत्रपती संभाजीनगर यांचा राहील**, याबाबत निविदाधारक / कंत्राटदारास कोणतेही लेखी सुचना देण्यात येणार नाही,
5) A) मंजूर झालेल्या निविदेबाबत खालीलप्रमाणे येणा-या **Additional Performance Security Deposit** ची रक्कम DD in favour of "Chief Accounts & Finance Officer Z.P. Aurangabad " यांचे नावे आठ दिवसात भरणा करावी लागेल, L1 निविदाधारकाने खालील दिलेल्या उदाहरणा प्रमाणे येणा-या रकमेचा Additional Performance Security Deposit Demand Draft आठ दिवसात जिल्हा परिषद (ल.पा.विभाग), जिल्हा जलसंधारण अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील. (उदाहरणार्थ जर निविदा दराच्या 19% कमी दराने देकार सादर झाल्यावर व तो स्विकृत झाल्यास Additional Performance Security Deposit भरणा करावा लागेल.)
   1) 10% कमी दरापर्यंत निविदा रकमेच्या 1% रक्कम
   2) 15% कमी दराचा देकार असल्यास प्रत्येकी 1% याप्रमाणे (15%-10% = 5%)
   3) 15 % पेक्षा अधिक दराच्या कमी देकार असल्यास दुपटीने म्हणजेच ( 19%- 15% = 4% ) करिता (4*2) = 8 % Additional Performance Security Deposit भरणा करावा लागेल.
   4) वरील प्रमाणे निविदा दाराच्या 19% पेक्षा कमी दरात देकार मान्य झाल्यास अतिरिक्त रक्कम एकूण (1 + 5 + 8 = 14 %) Additional Performance Security Deposit भरणा करावा लागेल.

   **B) धनाकर्ष उपलब्ध करुन देणे/धनाकर्ष परत करणे व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

   a. धनाकर्ष मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.छपत्रपी संभाजीनगर (Chief Acconuts and Finance Officer Z.P.Chhatrapati Sambhajinagar) यांच्या नावे असावा.
   b. धनाकर्ष ही सरकारी बँका किंवा शेडयुल्ड बँकाकडून काढलेली असावी.
   c. धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकापासून किमान 3 महिनेपर्यंत असावी.
   d. धनाकर्ष लिफाफा नं.1 व लिफाफा नं.2 उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या L-1 निविदाकाराने Additional Performance Security Deposit दोन दिवसाच्या आत या विभागास सा

करावा.लिफाफयावर कामाचे नाव व निविदा सुचना क्रमांक लिहिण्यात यावा.असे न केल्यास मक्तेदार अपात्र ठरवला जाईल.

e. प्रथम न्युनतम देकाराच्या L-1 निविदाकाराने विहित मुदतीत Additional Performance Security Deposit सादर न केल्यास द्वितीय न्युनतम देकाराच्या L-2 निविदाकारास लेखी विचारणा करुन L-2 निविदाकार L-1 पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा स्विकृत करण्यात येईल.

f. धनाकर्ष वर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

g. वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे/ धनाकर्ष चुकीच्या नावाचा सादर करणाऱ्या कंत्राटदाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबंधीत ठेकेदाराची नोंदणी एक वर्षासाठी स्थगित ठेवण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल व त्याचे सक्षम प्राधिकाऱ्यास अधिकार राहतील.

h. टेक्निकल व फायनांन्सीयल ओपनींग नंतर पात्र ठरलेले निविदाकार/कंत्राटदार यापैकी L-1 म्हणून नमूद झालेनंतर सदर L-1 निविदाकार/कंत्राटदार यांना माघार घेता येणार नाही. संबंधीतांनी तसे केल्यास सदर निविदाकार/कंत्राटदाराची EMD Forfieted करुन त्याचे रजिस्ट्रेशन रदद बाबतचा प्रस्ताव सभम प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल.

i. धनाकर्ष कामाचे नाव व कामाच्या किंमतीस सादर करणे आवश्यक आहे.

j. काम समाधानकारकपणे पुर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदीप्रमाणे कंत्राटदारांकडून प्राप्त परफॉर्मन्स सिक्युरिटीची रक्कम कंत्राटदारांना जिल्हा जलसंधारण अधिकारी हे परत करतील.

6) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.जीएसटी-1017/प्र.क्र. 81/ कराधान-1/दि.19 ऑगस्ट 2017 अन्वये कंत्राटदाराने निविदा भरताना GST कराच्या बोज्याचा विचार करूनच निविदा भरावी.याबाबत नंतर कुठलाही आक्षेप स्वीकारला जाणार नाही, सदर कामांच्या परिशिष्ट ब मध्ये (BOQ) कामाप्रित्यर्थ रक्कम व शासकिय विमा , स्वामीत्व धन शुल्क आणि वस्तु व सेवा कर (GST) रक्कमेचा अंतर्भाव असुन कंत्राटदाराने कमी/ अधिक दर भरताना फक्त कामाप्रित्यर्थ रक्कम विचारात घेवुन त्यानुसार कंत्राटदाराने भरलेले कमी/अधिक दर शासकिय विमा, स्वामित्व धन व वस्तु व सेवाकर (GST) या रकमेवर लागु राहणार नाहीत, सदर कामांच्या परिशिष्ट ब मध्ये (BOQ) दर्शविण्यात आलेली शासकिय विमा , स्वामीत्व धन शुल्क आणि वस्तु व सेवा कर (GST) बाबत शासकिय नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, ज्या कंत्राटदाराची सर्वात कमी दराची निविदा मंजुर होईल त्यांनी कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी शासकिय विमा रक्कम भरल्याची पावती सादर केल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात येतील, सदरील कामांच्या निविदेतील आर्थीक लिफाफे उघडल्याच्या दिवसापासुन सात दिवसाच्या आत अतिरिक्त सुरक्षा ठेव (PSD) , सुरक्षाठेव (SD) व इतर कागदपत्रांची पुर्तता न केल्यास सदर कामाबाबत L2 यांना विचारणा करून त्यांची निविदा नियमानुसार मंजुर करण्यात येईल, व L1 ची EMD जप्त करून त्यांना ब्लॅक लिस्ट करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, सदर कामाची देयके निधी उपलब्धतेनुसार पारित करण्यात येतील. निधी अभावी अथवा अन्य तपासणी संदर्भातील मुद्यांच्या अनुषंगाने देयक प्रलंबित राहील्यास त्यावर कोणतेही व्याज देय होणार नाही.तसेच बिल उपलब्धतेबाबत कुठल्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

**<u>कामे पूर्ण न केल्यास दंड आकारणी</u>** - प्रस्तुत कामे **सिंचन तलाव दुरुस्ती** (0 ते 100 हेक्टर) (2702-101-27) निधीतील असून नियोजीत कालावधीत कामे पुर्ण करणे आवश्यक आहे. सबळ कारण असल्याखेरीज निविदेनुसार पूर्णत्व कालावधीत काम पूर्ण न केल्यास कंत्राटदारास पुढीलप्रमाणे दंड आकारणी केली जाईल.निविदेमध्ये नमुद केलेल्या B-1 clause - 2 नुसार कामाचे पुर्णत्वाचे टप्पे खालीलप्रमाणे असावेत.

25% काम-1/4 कालावधी , 50% काम-1/2 कालावधी , 75% काम-3/4 कालावधी, 100% काम- पुर्ण कालावधी. निविदेनुसार विहित कालावधीत काम पुर्ण न केल्यास आणि विलंब समर्थनीय नसल्यास कंत्राटदारास महाराष्ट्र जि.प.व पं.स.अधिनियम 1968 चे कलम 14 नुसार खालीलप्रमाणे दंड आकारणी केली जाईल.

| लागणारी मुदतवाढ (निविदेनुसार पुर्णत्व कालावधीच्या) | दंड आकारणी |
|---|---|
| 0 ते 25 % कालावधी | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 0.01% प्रति दिन |
| 25 ते 50 % कालवधी | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 0.02% प्रति दिन |

| 50 % पेक्षा पुढील कालावधी | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 0.05% प्रति दिन |
|---|---|

वरील तक्त्यानुसार विहित कालावधीत काम पूर्ण न केल्यास आणि विलंब समर्थणीय नसल्यास कंत्राटदाराकडून करारनाम्यातील Clause -2 प्रमाणे प्रतिदिन 1% टक्याच्या कमाल मर्यादेत दंड आकारणी करण्याचे अधिकार अतिक्ति मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील, प्रकरणामधील गुणवत्तेनुसार दंड रक्कम कमी जास्त करण्याचा अधिकार त्यांना राहील. तसेच दंडाची रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 10% पेक्षा जास्त असणार नाही अशी तरतुद आहे.

A. म.शा. सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि.01/2015 प्रक्र 20/इमा 2 दि.24/04/2015 नुसार सुशिक्षीत बेरोजगार
अभियंता हयाच जिल्हयातील असावा.

B. जिल्हा परिषदेकडील सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांना त्यांचेसाठी आरक्षीत राखीव असलेल्या कोटयातुन एकावेळी Bid Capacity विचारात घेऊन जास्तीत जास्त 3 कामे वाटप करता येतील.

C. म.शा. सार्वजनिक बांधकाम विभाग शा.नि.01/2015 प्रक्र 20/इमा 2 दि.24/04/2015 नुसार मजुर सहकारी संस्था औरंगाबाद जिल्हयातील असावी.

D. जिल्हा परिषदेकडील मजूर सहकारी संस्था यांना त्यांचेसाठी आरक्षीत राखीव असलेल्या कोटयातुन एकावेळी Bid Capacity विचारात घेऊन जास्तीत जास्त 3कामे वाटप करता येतील.

**वरील सर्व माहीती व अटी मान्य असल्यासच निविदा भरावी.**

## C) इतर आवश्यक सुचना

1) निविदाकारांनी आपला मोबाईल क्रमांक (whats app & calling both) व E-mail ID दस्तवेजासोबत देणे बंधनकारक आहे. तसेच निविदासंदर्भातील पत्रव्यहार हा E-mail द्वारेच करण्यात येईल.

2) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित सुबेअ/मजूर सोसा./पात्र नोंदणीकृत कंत्राटदाराने 07 दिवसांच्या आत काम सुरु न केल्यास पुढील निम्नतम देकारास शासन निर्णयानुसार प्रथम निम्नतम देकाराच्या दराने काम देण्यात येईल.

3) आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे (Documents) सदर विहित केलेल्या तांत्रिक लिफाफयातच अपलोड करणे आवश्यक आहे.आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे (Documents) इतरत्र अपलोड केल्यास निविदाकारास निविदा प्रक्रीयेतून अपात्र करण्यात येईल.

4) निविदा सादर करतांना Online भरणा करण्यात आलेली निविदा फि रक्कम रु.2360/- ही नापरतावा असते. शासनाकडून निधी उपलब्ध होऊ शकला नाही तर निधी अभावी काम थांबवता येणार नाही.निधी उपलब्ध झाल्यानंतरच देयक अदा केले जाईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.(सदर बाबतचे प्रतिज्ञापत्र सोबत सादर करणे आवश्यक राहील.)

5) *Bid shall be treated as 'Invalid' if scan copies of all above documents not submitted online along with the bid.*

6) *Contractor shall make payments of salaries and wages to all the employees and Labouers through bank account linked to Unique Identification Number (AADHAR CARD) and shall submit a certificate accordingly to the Engeneer-in-charge. The certificate shall be submitted by the contractor within 60 days from the commencement of contract. If the time period of contract is less than 60 days, the such certificates shall be submitted within 15 days from the date of commencement of contract.*

7) *Time allowed for completion of each work is shown in above Table and defect liability period shall be 24 months (730 days) from the date of completion of work.*

8) *Performance Security Deposit* चा धनाकर्ष (डी.डी कार्यालयास निविदा व्यापारी लिफाफा उघडणे पासून आठ दिवसाचे आत जमा करणे बंधनकारक आहे. मुदतीत डी.डी प्राप्त न झाल्यास वा योग्य त्या रक्कमेचा डी.डी नसल्यास मक्तेदाराची ई-निविदा अपात्र घोषित करण्यात येईल.व निविदेसोबत सादर केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येऊन मक्तेदाराचे लायसन्स एक वर्षासाठी निलंबीत करण्यात येईल मुळ डी.डी कार्यालयास निविदा व्यापारी लिफाफा

उघडण्यापासून आठ दिवसाचे आत जमा करणे बंधनकारक आहे.

9) मक्तेदाराने निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली ) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.500/- च्या बाँड पेपरची मुळ प्रत Scan करुन प्रत्येक निविदेसोबत Online जोडणे बंधनकारक असून त्याची मुळ प्रत जलसंधारण विभाग, जि.प.छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात जमा करण्यात यावी. असे न केल्यास संबंधित मक्तेदारास अपात्र करण्यात येईल. सदर स्टॅम्प पेपर हा तहसिल कार्यालयातून सांक्षाकिंत केलेला असावा (सदर प्रतिज्ञापत्राचा नमुना हा टेंडर डाक्युमेंट मध्ये दिलेला आहे.) या नुसार निविदेतील लिफाफा क्र.1 मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार राहील त्यास विभागाचे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असणार नाहीत.

10) सुशिक्षीत बेरोजगार अभियंते यांचेसाठी पहिल्याच कामासाठी रु.15.00 लक्ष पर्यंतचे कामासाठी Work Done प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. तथापी,सदरील काम हे प्रथम काम नसल्यास किमान रु.15.00 लक्ष कामाचे Work Done प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच संबंधीत निविदा सादर करणाऱ्या सुबेअ यांनी परिशिष्ट 2 मध्ये दिलेले बंधपत्र निविदे सोबत सादर करणे बंधनकारक आहे.

11) जे सुशिक्षीत बेरोजगार अभियंता,सहकारी संस्थेमध्ये समाविष्ठ असतील त्यांना सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्याच्या कोटयातील स्वतंत्र कामे मिळणार नाहीत. तसेच सुशिक्षीत बेरोजगार अभियंता सहकारी संस्था यांचे कार्यक्षेत्र त्यांची नोंदणी ज्या जिल्हयामध्ये केली असेल त्या संबंधीत जिल्हयापुरतेच राहील.

12) सर्व मजुर सहकारी संस्था यांना सार्व.बांधकाम विभाग शासन निर्णय दि.23/07/2018 मधील तरतुदीनुसार त्यांचे राखीव कोटयातील कामांसाठी जिल्हा परिषदेकडील कामांचा कोटयातील मर्यादा पहाण्यात येईल.त्या आर्थिक वर्षामध्ये त्यांचा कोटा पुर्ण झालेनंतर त्यांनी राखीव कोटयातून निविदा भरल्यास सदरची निविदामध्ये त्यांना अपात्र करण्यात येईल.सर्व प्रवर्गातील कामांसाठी म.स.सो.यांनी त्यांचे पासबुकाची प्रत अपलोड करणे बंधनकारक राहील.तसेच जि.प.चे पासबुकच्या पहिल्या पानाची व पूढील कामाच्या नोंदी असलेल्या पानाची प्रत (काम मिळाले नसल्यास तरीही पुढील कोरे असलेले पानाची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे) अद्यावत असणे आवश्यक आहे.

13) सर्व सुबेअ यांनी ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.05/04/2023 नुसार त्यांचे राखीव कोटयातील कामांसाठी जिल्हा परिषदेकडील कामांचा कोटयातील मर्यादा पहाण्यात येईल.त्या आर्थिक वर्षामध्ये त्यांचा कोटा पुर्ण झालेनंतर त्यांनी राखीव कोटयातून निविदा भरल्यास सदरची निविदामध्ये त्यांना अपात्र करण्यात येईल.

14) सु.बे.अ व म.स.सो. त्यांचे साठी राखीव कोटयाची वार्षिक मर्यादा पुर्ण होण्याआधी त्याच आर्थिक वर्षात खुल्या मक्तेदारांसाठी राखीव कोटयातील कामांसाठी स्पर्धेत निविदा भरु शकतील (म.स.स.नोंदणी प्रमाणपत्राच्या मर्यादेत व सु.बे.अ.साठी नोंदणी प्रमाणपत्राच्या मर्यादेत)

15) म.स.सो. व सु.बे.अ. यांनी खुल्या मक्तेदारांसाठी राखीव कोटयातील कामे स्पर्धात्मक निविदा भरुन घेतल्यास त्यांची नोंद त्यांचे संवर्गाच्या वार्षिक कोटयामध्ये धरली जाईल याची नोंद घ्यावी.

16) लेखा परिक्षाणात काही अंतिम वसूल पात्र रक्कम निघाल्यास ती रक्कम भरणे मक्तेदारास बंधनकारक राहील. तसेच भविष्यात कुठल्याही करात वाढ झाल्यास किंवा कामासाठी जास्त खर्च करावा लागल्यास तसेच देयक अदायगीस उशीर झाल्यास कंत्राटदारास वाढीव मोबदला मिळणार नाही.

17) सुरक्षा अनामत रक्कम ही पार्ट-अ व पार्ट-ब यांच्या एकत्र बेरजेवर कपात करण्यात येईल.

18) मक्तेदाराने मशिनरी विषयक माहिती देतांना मशिनरी यादीमध्ये स्वमालकी व भाडे तत्वावर अशी स्वतंत्र माहिती द्यावी.तसेच खुल्या प्रवर्गातून निविदा भरणाऱ्या कंत्राटदारांकरीता स्वत:ची मालकीची/भाडेकराराची मशिनरी असणे बंधनकारक आहे. त्यात पोकलेन मशिन-1, जेसीबा-1, डंपर-2, ट्रॅक्टर-1, कॉंक्रीट मिक्सर-1 किमान गरजेचे आहे.

19) पार्ट-अ व पार्ट-ब वर एकत्रित रक्कमेवर करारनामा करुन द्यावा लागेल.

20) विशेष अटी नुसार दिलेले परिमाणापेक्षा जास्त काम केल्यास त्याबददल मक्तेदारास अतिरिक्त देयक मिळणार नाही.जास्तीचे काम केल्यास सदर काम लोकसहभागात गणना करण्यात येईल.

21) विशेष अटी नुसार कोणत्याही प्रकारच्या अतिरिक्त वहन व उचल अतंराचे देयक अदा केले जाणार नाही. अतिरिक्त वहन व उचल मक्तेदारास स्व:खर्चाने संबंधीत अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली करावे लागेल.

22) सर्व देयकातून पाणी चाचणी अनामत 5% कपात करण्यात येईल.लेखापरिक्षणानंतर व 2 पावसाळे उलटल्यानंतर उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्या अहवालानंतरच परत करण्यात येईल. तसेच खुल्या (open Tender) व मजुर सहकारी सोयायटी प्रवर्गातून भरलेल्या निविदांच्या देयकातून 5% सुरक्षा अनामत व सु.बे.अ.प्रवर्गातून भरलेल्या निविदांच्या देयकातून 2.5% सुरक्षा अनामत कपात करण्यात येईल.सुरक्षा अनामत दोष दायीत्व निवारण कालावधी पुर्ण झाल्यावर म्हणजेच एक वर्षानंतर उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्या अहवालानंतरच परत करण्यात येईल.

23) कार्यारंभ आदेश दिल्यापासून 8 दिवसाच्या आत कामास सुरुवात करणे बंधनकारक राहील.

24) No price escalation is allowed for this tender
25) Contractor has to bear the const of quality control measers if required
26) The payment of the work done as per availability of funds from Government. If funds are delayed from government no claims will be entertained
27) Right to reject or cancel any or all the tenders without assigning any reason thereof what so ever is reserved by the undersign

जिल्हा जलसंधारण अधिकारी
जि.प.(ल.पा.) छत्रपती संभाजीनगर

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जि.प.छत्रपती संभाजीनगर

अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प.छत्रपती संभाजीनगर

| अ.क्र. | कामाचेनाव | GST,Royalty, Insurence सह निविदा रक्कम | निव्वळ कामाची निविदा रक्कम | इसारा रक्कम/ बयाना रक्कम | प्रशासकिय मान्यता क्रमांक व दिनांक | तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक | TenderFee Rs.+वस्तू व सेवाकर | दे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सि.ना.बां. परसोडा ता. वैजापुर | 1465643 | 1157998 | 11580 | जा.क्र.931 दि. 29/09/2025 | ता.मा.क्र.86 दि.26/09/2025 | 1160 | |
| | TOTAL | 1465643 | 1157998 | 11579.98 | 0 | 0 | 1160 | |

Signature Not Verified
Digitally signed by BIDGAR KAPIL KONDAJI
Date: 2026.05.11 17:30:43 IST
Location: Maharashtra-MH